नॅक पुनर्मूल्यांकित 'A' ग्रेड

# पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर

(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित)

व

विद्यीपाठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

## दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

पॉवर ऑफ नॉलेज
विशेषांक
एप्रिल २०१८

ISSN-2320-4494
UGC approved
Sr.No. 45681

# संशोधनाच्या नव्या दिशा

संपादक

डॉ. माहेश्वरी गावित

# संशोधनाच्या नव्या दिशा


मुख्य संपादक

डॉ. माहेश्वरी गावित

समन्वयक

मराठी संशोधन केंद्र



प्रकाशक

पॉवर ऑफ नॉलेज

संशोधनाच्या नव्या दिशा

© प्राचार्य
पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर.

मुख्य संपादक
डॉ. माहेश्वरी गावित

प्रकाशक
श्रीमती लता सदाशिव सरकटे
POWER OF KNOWLEDGE
ISSN 2320 - 4494 UGC APPROVED NO - 45681
RNI NO. MAHAUL03008/13/1//2012-TC
विशेषांक : एप्रिल २०१८

टाईपसेटींग-लेआऊट
कुलकर्णी टाईपसेटर्स, अहमदनगर ९८५०२३२८९०

मुद्रक
मंगल प्रिंटर्स, अहमदनगर

मूल्य :- ३००/-

सदर ग्रंथामध्ये दिलेल्या शोधनिबंधातील विचार, कल्पना व संबंधित लेखासंबंधी संपादक आणि संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.

१५)	मराठी आणि हिंदी दलित आत्मकथने वास्तव आणि कल्पना :
एक तौलनिक निष्कर्ष / १०७
– प्रा.डॉ. प्रकाश जाधव
१६)	काव्य समीक्षा संशोधन : काही सूत्रे / ११३
– डॉ. सुधाकर शेलार
१७)	साहित्य प्रकारनिष्ठ समीक्षा / ११९
– प्रा.डॉ. विजया पाटील
१८)	वैचारिक साहित्य : संशोधनाच्या नव्या दिशा / १२५
– कु. सारिका पाचरणे
१९)	मराठीतील बालकादंबरीचे स्वरूप (सन १९९० ते २०१०) / १३१
– संतोषकुमार राठोड
२०)	लोकसाहित्यविषयक संशोधन / १३६
– प्रा.डॉ. विजय पाटील
२१)	लोकसाहित्यातील क्षेत्रीय संशोधन / १४२
– प्रा.डॉ. सुभाष शेकडे
२२)	लोकसाहित्यातील 'स्त्रियांच्या जात्यावरील' ओव्या / १५५
– प्रा. विक्रम कांबळे
२३)	सोंग लोककलेची प्रयोजने : स्वरूप परंपरा / १६१
– प्रा.डॉ. ज्योती माने
२४)	लोकसाहित्यातील लोककलांचे संशोधन : बहुरुपी / १७१
– प्रा. रामदास कातकडे
२५)	आदिवासी कणसरी कथांची कथनमीमांसा / १७९
– डॉ. अंजली मस्करेन्हस
२६)	लोकसाहित्यविषयक संशोधन / १८७
– डॉ. वि. दा. म्हस्के
२७)	लोकसाहित्याचे स्वरूप / १९३
– प्रणाली पोकळे
२८)	लोकसाहित्यविषयक संशोधन / १९९
– संजय भुतांबरे
२९)	विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्यांचे संशोधन :
आवश्यकता व पद्धती / २०३
– प्रा.डॉ. वृंदा देशपांडे-जोशी

# लोकसाहित्यातील लोककलांचे संशोधन : बहुरुपी

– प्रा. रामदास पंढरीनाथ कातकडे
प्रवरा मेडीकल ट्रस्टचे आर्टस्, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज
शेवगाव ता. शेवगाव जि.अ.नगर

........................................................................................

भाषा ही एक सामाजिक सजीव संस्था आहे. त्याचबरोबर भाषा ही सामाजिक संप्रेषणाचे एक माध्यम आहे. भाशेचे हे संप्रेषण प्रवाही करण्यासाठी भाषिक कौशल्य आत्मसात करणे गरजेचे आहे. कारण याच भाषिक कौशल्यातून सौंदर्यानुभूती निर्माण होते आणि या सौंदर्यानुभूतीच्या अंतरंगातून अभिरुची उदयास येते. दृक–श्राव्य–स्वरादी तसेच इंद्रियोगोचर संवेदनाही भाषेत महत्त्वाच्या असतात. नृत्य, स्थापत्यादी आविष्कृत होतात. संवेदनांचे हे आविष्करण मानवी संस्काराच्या परिवेशाने फलद्रूप झालेले असते. आणि याच मानवी संस्काराला भूत आणि वर्तमानाचे परीघ असतात आणि म्हणून मराठी साहित्य संशोधनाच्या परिक्षेत्रांत प्रवेश करताना भूत, वर्तमान आणि भौतिक परिघांची सर्वसमावेशकता स्वीकारल्यामुळे संशोधनाचे क्षेत्र निकोप होऊ शकते.

साहित्य, कला आणि विज्ञान या ज्ञानक्षेत्रांचा सूक्ष्मपणे अभ्यास करणे ही खऱ्या अर्थाने काळाची गरज झालेली आहे. आजच्या या आधुनिक युगात वैज्ञानिक दृष्टीला सार्वत्रिक मान्यता मिळत असून त्यातूनच पुढे संशोधनाची क्षितीजे अधिकाधिकतेचा विचार केला तर कला आणि वाङ्मयाचा क्षेत्रात काही प्रमाणात वैज्ञानिकतेऐवजी पारंपरिक विचारांचाच अवलंब केला जात असल्यामुळे वर्तमानाशी संवाद होणे अतिशय अवघड झाले आहे. काही विद्याशाखा कला आणि वाङ्मयाच्या अभ्यासापेक्षा व्यावसायिक विद्याशाखांकडे अधिक आकर्षित

होत आहे. कला आणि वाङ्मयाचे ज्ञान हे जीवन जगण्यासाठी उपयोगी नाही हा वृद्धिंगत होणारा दृष्टिकोन एक चिंतेची बाब आहे. खऱ्या अर्थाने कला, वाङ्मय आणि मानव्यविद्या हे मानवी जीवनाला तात्त्विक अधिष्ठान देणाऱ्या ज्ञानशाखा आहेत. बदलत्या काळाचा आपण जर विचार केला तर संशोधकांनी तसेच अभ्यासकांनी पारंपरिकतेऐवजी वैज्ञानिक अथवा शास्त्रीय दृष्टिकोन स्वीकारणे अत्यंत गरजेचे आहे.

लोकसंस्कृतीचा एक महत्त्वपूर्ण भाग म्हणजे लोकसाहित्य होय. लोकसाहित्याचे अभ्यासक, विद्वान आपल्या अभ्यासातून वेगवेगळ्या व्याख्या मांडताना दिसतात. पण तरीही लोकसाहित्य हे लोकांनीच निर्माण केलेले असते हे महत्त्वाचे आहे. परंपरेने आपोआप पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेल्या सर्व कथागितांना कोणी एकच एक कवी लेखक नसतोच म्हणजेच सर्व लोकांचे मनच ती कृती घडवते. सर्व लोकांच्या स्मृतीत ती टिकते आणि लोकजीवनात तिचा प्रवाह अखंड व आपोआप चालत राहतो. म्हणून त्या कथांना म्हणायचे लोककथा आणि त्या गीतांना म्हणायचे लोकगीते! या लोककथा आणि लोकगीते यांचे जे निर्माते असतात त्यांना जागे ठेवण्याचे काम ही लोकमतच करीत असते. म्हणून त्याला म्हणायचे लोकसाहित्य.

लोक हा शब्द नेहमीच बहुवचनात वापरला जातो. महाराष्ट्रात लोकसाहित्याचे संकलन आणि त्यासंबंधीचे लेखन १८५७ पासून सुरू झाले. १९२० साली कै. वि. का. राजवाडे यांनी लोकगीते, लोककथा हे पारिभाषिक शब्द वापरले होते. त्याचबरोबर दत्तो वामन पोतदार यांनी इंग्रजीतील भाषांतर म्हणून लोकविद्या हा शब्द वापरला. दुर्गा भागवत यांनी देखील 'लोकसाहित्य' हा परिभाषिक शब्द सुचविला आहे.

१. डॉ. सुनीतीकुमार चटर्जी- पितृपरंपरागत जीवनयात्रेची पद्धती ज्या सामाजिक आचार-विचार, श्रद्धा आणि वाङ्मय यांच्यामधून अभिव्यक्त होते ती पद्धती म्हणजे लोकसाहित्य होय
२. लोकांमध्ये प्रचलित असलेल्या मौखिक परंपरा म्हणजे लोकसाहित्य होय.
३. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होणाऱ्या मौखिक परंपरेला लोकसाहित्य असे म्हणता येईल.

लोकसाहित्य ही एक व्यापक संज्ञा आहे. पारंपरिक लोकजीवनाच्या सर्व माध्यमातून झालेल्या आविष्कारांचा त्यामध्ये समावेश होतो. हा अभ्यास प्रामुख्याने चार भागात केला जातो.

१. मौखिक आविष्कारांचे विविध आकृतिबंध
२. भौतिक लोकसंस्कृतीचे आविष्कार
३. लोकरुढी, विधी आणि लोकसमजुतींचा वारसा
४. प्रयोगसिद्ध लोककला.

अशा प्रकारे लोकसाहित्याची व्याप्ती ही संस्कृतीच्या समग्र आविष्कारांना व्यापणारी आहे. केवळ शब्द-प्रधानगीते, कथा, म्हणी, वाक्प्रचार म्हणजे लोकसाहित्य नव्हे तर जागरण, लग्न असे विधी करणे. बोहाडा, रामलीला, भवई, भारुड यासारखे लोकनाट्याचे आविष्कार प्रयोगरूप असतात. रांगोळ्या भित्तीचित्रे यासारखे चित्राविष्कार, फुगड्या, लेझीम, हमामा, विटीदांडू यांसारखे खेळ भांडी औजारे करण्याच्या पद्धती यासारखी पारंपरिक कौशल्ये या सर्वांचा समावेश लोकसाहित्यात होतो. अशा व्यापक अर्थाने व सांस्कृतीक अंगाने लोकसाहित्याचे आकलन व विश्लेषण समजून होता येते. याच लोकसाहित्यामधील लोककलांचे संशोधन होणे गरजेचे आहे. संशोधन हे शास्त्रीय विचार पद्धतीने केलेले सत्यान्वेषण असते.

**लोककला :-**

कलाविष्कार हा मानवी भावभावनांचा सौदर्यात्मक आविष्कार होय. मनात काही येणे, उत्कट प्रेरणांनी ते प्रकट करावेसे वाटणे, त्यासाठी रंग, ध्वनी, शरीर अशा माध्यमांमधून ते प्रगट करणे हे कलेचे प्राथमिक स्वरूप असते. लोककलांची निर्मिती ही समूहमानसामधून होते. ईश्वरविषयक श्रद्धाभावना, धर्मकल्पना व सर्जक जाणिवा कलाविष्कारांस प्रवृत्त करीत असतात. व्यक्तिगत भावभावनांचे सामुहिकीकरण होत जाते. लोककलाविष्कार हे मौखिक परंपरेने चालत आलेली लोकसाहित्याची अंगे आहेत. मानवी लोकसमूहाचे ग्रामीण आणि नागर असे साधारणपणे दोन भाग पडतात. नागरीकरणाचा, त्यातून उद्भवणाऱ्या कृत्रिमपणाचा प्रभाव ग्रामीण अनागर जीवनपद्धतीत कार्यरत असतो. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांची गीवनशैली ही निसर्गाशी इमान राखणारी असते. हे आदिम ग्रामीण लोकसमूह आपले जीवन जगत असतांना, जगण्याचा अंगभूत भाग म्हणून आपल्या जीवनशैलीचा जो कलात्मक आविष्कार करतात त्याला लोककला असे म्हणता येते.

लोककला ही अत्यंत व्यापक संज्ञा आहे. म्हणजेच जुन्या कपड्यांची गोधडी शिवण्यापासून हातावर मेहंदी काढण्यापर्यंत यादी करता येईल. जीवनाशी संबंध असणाऱ्या कोणत्या ना कोणत्या कामाशी, विधीशी संबंध असणाऱ्या त्यांचा संबंध असतो. सामाजिक जाणिवेतून लोककलांची निर्मिती होते. आणि

या सामाजिक जाणिवा शतकानुशतके जिवंत ठेवण्याचे कार्य लोककला करतात. म्हणून मानवी जीवनातील जाणीवविचाराचे सम्यक दर्शन घडविणारा आरसा म्हणूनही लोककलांचे महत्त्व असते. विधी कर्माच्या साहचर्याने अस्तित्वात येणारा, जनलोकांच्या सामूहिक नेणिवेतील भावविश्वाचे प्रतिनिधित्व करणारा लोकवाद्याच्या व लोकमाध्यमांच्याद्वारे आविष्कृत होणाऱ्या व्यक्तिगत वा सांघिक कलाविष्कारास लोककला म्हणतात. आपला देश हा खेड्यांनी बनलेला आहे. खेडेसुद्धा एकमेकांशी जोडलेल्या जातीजमातींनी बनलेले असते. गावात कायमस्वरूपी राहणाऱ्या लोकांप्रमाणेच दोन-चार दिवसांसाठी येणारे फिरस्ते ही असतात. काहीजण करमणुकीचे खेळ करतात. तर काहीजण खेड्यातल्या लोकांच्या गरजा भागविण्यासाठी अन्य प्रकारची कामे करतात आणि पोट भरतात. या फिरस्त्यांपैकी एक म्हणजे - बहुरुपी होय.

बहुरुपी :-

'बहुरुपी' हा ग्रामीण भागातील एक लोककलावंत होय. गावोगाव भटकून आपला व्यवसाय करणाऱ्या लोकांना बहुरुपी असे म्हणतात. बहुरुपी म्हणजे वेशांतर करून लोकांच्या मनोरंजनासाठी निरनिराळी सोंग धारण करणारा तो बहुरुपी होय. त्यालाच 'राईरंद' असे ही म्हणतात. बहुरुपी हा समाज परप्रांतातून आलेला नसून, तो या महाराष्ट्रातलाच आहे. त्याची अशी जातीसंस्था नाही.

प्राचीन काळापासून बहुरुपी हा व्यवसाय करणाऱ्या कोणत्याही जातीच्या माणसाला बहुरुपी जातीचे प्रमाणपत्र होण्याची शासनाने सोय केली आहे. परंतु, आज काळाच्या ओघात बहुरुपी हा लोकरंजनपर लोककलाप्रकार आपले अस्तित्व राखण्यासाठी संघर्ष करत असताना दिसत असला तरी जेव्हा लोकरंजनाची भौतिक साधने उपलब्ध नव्हती तेव्हा मराठीजनांचे रंजन करण्याचे काम बहुरुप्यांनी अत्यंत इमाने इतबारे पार पाडले आहे.

बहुरुपी ही लोकरंजनाची फार जुनी संस्था आहे. संतांच्या सानिध्यात तर बहुरुप्यांचे दृष्टांत वारंवार आले आहेत. परमेश्वर हा एक मोठा बहुरुपी आहे. संत तुकारामांनी त्यांच्या एका अभंगात परमेश्वराचे वर्णन करताना-

**बहुरुपे नटला नारायण,**
**सांग संपादुन जैसा तैसा**

एकनाथांचे समकालीन संत जनार्धनांच्या जानकी यैवराज -

**येकू बहूरुपी केली शक्ती**
**नाना स्वांगी नाचविती**
**मंगला अमंगला आकृती**

**श्री रघुपती धरवी ती**

असा उल्लेख कलाकौशल्य दाखविण्यासाठी कोणत्याही प्रकारची रंगभूमी वा पार्श्वभूमी लागत नाही. जग ही एक रंगभूमी आहे हे शेक्सपिअरचे बहुचर्चित विधान बहुरुपी शब्दश: सार्थ करतात. बहुरुपी हा विविध सोंगे आणून लोकांचे मनोरंजन करतो. असा हा बहुरुपी वर्षातून एकदा ग्रामीण भागातील लोकांचे मनोरंजन करण्यास येणारा पाहुणा, जानपद नाट्योपासकांपैकी महत्त्वाचा व आद्य घटक आहे. निरनिराळ्या माणसांचे आणि पशुपक्ष्यांचे आवाज काढण्याचे कौशल्य अप्रतिम स्वरूपाचे असते. हा सामान्य जनांच्या दैनंदिन दिनक्रमात अलगद सामील होणारा कलावंत असतो.

**बहुरुप्यांची विवाह पद्धती :-**

बहुरुप्यांची विवाह पद्धतीत देवक, कुळ, गोत्र पाहतात. देवक, कुळ, गोत्र वेगळे असले म्हणजे बोलणी सुरू होते. लग्न जमवता ही मंडळी पूर्वी हुंडा घेत नव्हते. मुलीकडे ठेवण्यासाठी म्हणून अकरा रुपयापासून १०० रुपयापर्यंत पैसे देण्याची होती. पूर्वी लग्नसोहळा पाच दिवस चालत असे परंतु सध्या तीन दिवसात लग्न उरकतात. पहिल्या दिवशी देवकार्य, कुलदेवतेच्या नावाने बोकड कापतात. दुसऱ्या दिवशी हळदी समारंभ आणि तिसऱ्या दिवशी लग्न. यापद्धतीने पूढील सर्व विधी करतात.

**व्यवसाय :-**

बहुरुपी हा विविध सोंगे आणून लोकांचे मनोरंजन करतो. कधी तो राजाचे सोंग आणतो तर कधी - कधी पशुपक्ष्यांचे हुबेहूब आवाज ही काढतो बहुरुपी हा समाजच मुळचा कलावंत आहे. कला ही त्याच्या हाडामांसात भिनलेली असून प्राण्यांचे आवाज काढण्यात ही तरबेज असतो. बहुरुपी हा वाचिक आणि आंगिक अभिनयाने विनोद निर्माण करतो, तो असा-

**जिथे शांतता आहे, तिथेच बंदोबस्त लावला आहे.**
**लाच खायची बंद केली, हप्ते चालू केले**
**आरोपी जागेवर आहेत, साहेब फरार झाले**
**दंगली पेटली म्हणून साहेब घरी गेले.**
**साहेबांच्या नंबर आहे, दोन बोकडे एक पाठ**
**तुम्ही काल ट्रॅक्टरच्या काचा फोडल्या**
**रेल्वेच्या चाकाची हवा सोडली.**

या आरोपाखाली तुम्हाला अटक करून गाढवावर बसून घेऊन जाणार आहे. बहुरुपी हा ग्रामीण भागात काही क्षणात मनोरंजन करण्याचे काम करत असतो.

त्याचबरोबर बहुरुपी हा लग्नाच्या आमंत्रणाचा ही गमतीदार कार्यक्रम करतो. त्यात बहुरुपी लग्नाचे हे विडंबन नाट्य उभे करताना विनोदी संवाद करतात. त्यात गाण्यातुन लग्नाचे विनोदी वर्णन पुढीलप्रमाणे करतो.

**लग्नाला चला तुम्ही लग्नाला चला**
**सखुबाई ठकुबाई, येडाबाई धोंडाबाई**
**लग्नाला चला तुम्ही लग्नाला चला**
**डोळ्यामध्ये बिव्याचं आंजन घाला**
**उतरडिसंगे फुगडी खेळा**
**जेवायला केली चिखलाची कढी**
**तोंडी लावायला दगडाची वडी**
**नानाची नानी बघा कशी शेंडी ओढी**
**लग्नाला चला तुम्ही लग्नाला चला**
**इंथ काही जेवायंच नाही, तिथ काही खायचं नाही**
**तुम्ही आल्याबिगर मातुर भागायचे नाही**
**शनिवारचं लगीन, आईतवारची हळद**
**शेणांन भरलं बघा सारं घरातलं बळद**
**लग्नाला चला तुम्ही लग्नाला चला......**

यापद्धतीने लग्नाच्या आमंत्रनाचे वर्णन तो गमतीदार करतो. बहुगुणी लोककलावंत असलेला बहुरुपी अनेक लोकथांचा, दंतकथांचा नायक आणि विषय बनला आहे. अशाप्रकारे लोकांचे मनोरंजन करुन पोटाला हक्काने मागून घेतो.

**पोशाख** – डोक्याला फौजदारासारखी टोपी. खिशावर स्टार असलेली खाकी सदरा आणि खाकी फुल पॅन्ट, कमरेला फौजदारी पट्टा पायात बुट हातात काठी डोक्याला गॉगल असा फौजदारासारखा पोशाख बहुरुप्याचा असतो.

**सण**– बहुरुपी हा समाज इतर समाजाप्रमाणेच सर्व सण साजरे करतात.

**देव**– बहुरुपी इतर समाजाप्रमाणेच सर्व देवांची भक्ती करतात.

**अंधश्रद्धा**– बहुरुपी हा समाज ही इतर समाजप्रमाणेच अंधश्रद्धेचा बळी ठरलेला आहे. या समाजातील स्त्रियांच्या अंगात देव येण्याचे प्रमाण अधिक आहे. अंगात आलेली व्यक्ती जे सांगेल ते सत्य समजतात. त्यांच्या मुखातून देवच बोलतो अशी कल्पना समाजात आहे. देवीचे कौर करतात. आषाढी अमावस्येला मरिआईचा आठखुरी मेंढीचा बळी देतात. त्यामुळे देवी शांत होऊन

हागरी वखरीसारख्या रोगांचा प्रादुर्भाव टळतो अशी त्यांची श्रद्धा आहे.

**जातपंचायत–** बहुरुप्यांच्या जातपंचायतीची परंपरा पूर्वापार चालत आलेली आहे. पंचायतीत पाच पंच असतात. त्यांचा एक प्रमुख असतो. त्याला 'कारभारी' असे म्हणतात. त्यालाच न्यायाधीशाचा दर्जा असतो.

जातपंचायतीत येणारे तंटे, किरकोळ कारणावरून उद्भवलेले परिणामकारी तंटे, अनैतिक संबंध, सामाजिक कार्यात अडचण, बिगर हक्काच्या गावात कार्यक्रम करणे, सोईरसंबंधातील काही समस्या, अशा स्वरूपाचे तंटे त्यांच्या जातपंचायतीत येतात. तंट्याचे स्वरूप व गांभीर्य लक्षात घेऊन कारभारी त्यावर नि:पक्षपातीपणाने विचार करतात. त्याला शिक्षा म्हणून जातीबाहेर टाकणे, त्याचबरोबर कोणत्याही गावात खेळ करू न देणे, आर्थिक दंड करणे इ. अनेक प्रकारे शिक्षा केली जाते.

**प्रामाणिकपणा–**ब्रिटिशांच्या काळात एकदा दोन बहुरुपी मामलेदार आणि त्याचा पट्टेवाला अशी सोंगे घेऊन टांग्यात बसून एका दूरच्या खेड्यात गेले. तेथे त्यांनी गावच्या पाटलाकरवी गावातील प्रतिष्ठित व्यापारी व शेतकरी अशा वजनदार आसामींना बोलावले. सरकारने अमका एक निधी सुरू केला आहे असे सांगून बराच पैसा गावातून गोळा केला. शेवटी खूप वेळानंतर आपण बहुरुपी आहोत असे सांगून त्यांनी आपली ओळख दिली. ज्याच्या त्यांचा पैसा प्रामाणिकपणे परत केला आणि पाटील व गावकऱ्यांकडून बक्षिसी मिळविली.

अकबर आणि बिरबल यांच्या कथांमध्येही बहुरुपी आला आहे. बहुरुप्याच्या कौशल्याचे खरे दर्शन त्याने आणलेल्या हुबेहूब सोंगात असते.

बहुरुप्याची वैशिष्ट्ये–

१. बहुरुपी हा एक उत्तम वाक्पटू असतो.
२. त्याचे बोलणे अत्यंत चातुर्यपूर्ण आणि हजरजबाबीपणाचे असते.
३. बहुरुप्याची भाषा अनुप्रासात्मक, लयबद्ध, कृत्रिम पण सुंदर आणि प्रभावी असते.
४. बहुरुप्याच्या नाट्यप्रयोगाची संहिता नसते, रंगमंच नसतो.
५. बहुरुप्याच्या कलाविष्कारात एक प्रकारचा मुक्तपणा आढळतो.
६. बहुरुपी समकालावर सहज आणि उत्स्फूर्त भाष्य करतो.
७. बहुरुपी सामाजिक व्यंगावरही बोट ठेवतो.
८. बहुरुप्याच्या सादरीकरणाची काळवेळ ठरलेली नसते.
९. बहुरुपी हा सामान्य जनांच्या दैनंदिन दिनक्रमात अलगद सामील होणारा कलावंत असतो.

१०. बहुरुप्याच्या सादरीकरणात आवाहकता असते.

याप्रकारची वैशिष्ट्ये बहुरुप्याची आपल्याला पाहायला मिळतात.

आज मात्र ग्रामव्यवस्था शहरीकरणाकडे झुकू लागल्याने लोकसंख्या क्षीण होऊ लागल्या आहेत. पूर्वी भिक्षेकऱ्याला सुपाने भरभरून दान देण्याची प्रथा होती. बदलत्या काळात दानाची दानत राहिली नाही. म्हणून लोकांवर अवलंबून राहून पोट भरणार नाही, या विदारक सत्याची जाणीव आज लोकसंख्येच्या प्रत्येक घटकाला झाली आहे. त्यामुळे परंपरागत उद्योग सोडून नवा उद्योग शोधण्याचे आवाहन लोककलाकारांपुढे उभे आहे. म्हणून आता आमचा सामाजिक परंपरेचा आणि लोकरंगभूमीवरील लोककलांचा अविभाज्य घटक असणारा बहुरुपी दुर्मिळ आणि विरळ झाला

अलिकडच्या काळात पु. ल. देशपांड्यांच्या एकपात्री प्रयोगांनी, लक्ष्मण देशपांड्यांच्या 'वऱ्हाड'च्या प्रयोगांनी बहुरुपी या लोकसंस्थेची नवी रुपे समाजासमोर आणली आहेत. या लोककला प्रकारचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न केला आहे. बहुरुपी ही लोकसंस्था मागे पडणे स्वाभविक असले तरी एकपात्री नाट्यप्रयोगातून बहुरुप्याचा नवा वारसा तयार होतो आहे.

संदर्भ :-


१. महाराष्ट्रातील भटका समाज : संस्कृती व साहित्य- डॉ. नागनाथ धो. कदम
२. लोकरंजनाची पारंपरिक माध्यमे : डॉ. शरद व्यवहारे
३. पालातील माणसे : डॉ. विमल मोरे
४. लोकसाहित्य: डॉ. सुरेश पाटील
५. लोकसाहित्य व आधुनिक साहित्य: डॉ. एकनाथ पगार
६. वृत्तपत्रेलेख आणि मुलाखती
७. लोकसाहित्य स्वरूप : डॉ. प्रभाकर मांडे
८. लोकसाहित्य : शोध आणि समीक्षा : डॉ. रा. चिं. ढेरे
९. लोकसाहित्य संशोधन पद्धती: डॉ. अनिल सहस्रबुद्धे


•••